श्री राम चंद्र मिशन®

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY





## चेन्नई येथे गुरुदेव

नवीन वर्षाच्या आनंदोत्सवानंतर गुरुदेव त्यांच्या निवासस्थानी 'गायत्री' येथे जाण्याचा विचार करीत होते, परंतु त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांनी आराम करण्याचे ठरवले.

संध्याकाळी भारतातील विविध भागातील तसेच परदेशातील अभ्यासींचा मोठा समूह गुरुदेवांच्या भेटीची प्रतीक्षा करत होता. ते त्यांच्या कार्यालयातून बाहेर आले व म्हणाले, "तुम्ही मला भेटण्यासाठी खूप वेळ सोशिकपणे वाट पहात आहात हे पाहून मला आनंद झाला आहे." असे म्हणून, त्यांनी सुमारे १० मिनिटे मार्गिकेत उभे राहून, बातचीत करत तेथे उपस्थित असलेल्यांसोबत अमूल्य वेळ व्यतीत केला. तेथे जर्मनी, फ्रान्स इत्यादि देशांतून आलेले अभ्यासी होते. गुरुदेव विनोदाने म्हणाले, "जर्मनी कशासाठी तरी प्रसिद्ध आहे, फ्रान्स पावासाठी प्रसिद्ध आहे, इटली कॉफीसाठी प्रसिद्ध आहे आणि भारत आध्यात्मिकतेसाठी प्रसिद्ध आहे."

दि. ४ जानेवारी रोजी गुरुदेवांनी ध्यानकक्षामधे सत्संगाचे संचालन केले. दुसऱ्या दिवशी भार्गव लंडनला जाणार होता त्यामुळे गुरुदेव पहाटे ४ वाजताच उठले व भार्गवला निरोप देण्याकरिता आले. गुरुदेव त्यानंतर बाहेरच थांबले व त्यांनी पहाटे ५.३० वाजता कॉफीचे सेवन केले.

दि. ७ जानेवारी रोजी गुरुदेव प्रसारमाध्यमे संघाच्या कार्यशाळेला गेले व त्यांनी 'बंधुत्व' या त्या दिवसाच्या मध्यवर्ती कल्पनेवर उपस्थितांना संबोधित केले. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी श्रोत्यांना "तुम्ही सर्व खरे अभ्यासी आहात का?" असे विचारले. ते पुढे म्हणाले, "जर तुम्ही सर्व खरे अभ्यासी असाल तर बंधुत्वावर कार्यशाळा का असावी हे मला समजत नाही." त्यांनी प्रत्येकाच्या 'मी' पणा मुळे उद्भवणारी भांडणे, मतभेद, गटबाजी व एकोप्याने एकत्रितपणे काम करण्याच्या असमर्थतेचा उल्लेख केला. ते म्हणाले की, मी अभ्यासींसहीत सर्व काही बाहेर फेकून देऊन, बाबूजी महाराजांच्या काळात परत जाऊन काही मोजक्या अभ्यासींसह कशीतरी सर्व व्यवस्था करणे पसंत करेन. त्यानंतर ते म्हणाले, "मी आशा करतो की तुमच्या अत्यंत बुद्धिमान डोक्यांमध्ये, जी इतकी बुद्धिमान आहेत की त्यांना इतरांची बुद्धिमत्ता ओळखू येत नाही, त्यांमध्ये थोडी अक्कल येवो." त्यांनी बंधुत्वावर बोलण्याऐवजी बंधुत्व आचरणात आणण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

## रविवार, ८ जानेवारी २०१२

सत्संगाचे संचालन केल्यानंतर गुरुदेव आपल्या कुटीरामध्ये परत आले आणि काही काळानंतर ते रशियन भाषेच्या पाठासाठी त्यांच्या कार्यालयात जात असताना अभ्यासी त्यांना भेटण्यासाठी रांगेत उभे असल्याचे पाहून ते विनोदाने म्हणाले, " तुम्हा सर्वांना आज सकाळी एक अद्भुत सत्संग मिळाला आहे. यापेक्षा जास्तीची अपेक्षा माझ्याकडून करू नका."

रशियन भाषेच्या पाठानंतर ते अभ्यासींच्या गटासोबत त्यांच्या कार्यालयात बोलत होते. भाषांबद्दल बोलताना ते म्हणाले, " नवीन भाषा शिकण्यातला अवघडपणा सुरुवातीच्या काही भाषांपुरताच मर्यादित असतो. एकदा का तुम्ही भाषा शिकण्याच्या प्रक्रियेतून गेलात तर नविन भाषा शिकणे सहजसाध्य होते." ते म्हणाले, "तुम्ही समजता त्यापेक्षा सुखाची किंमत कितीतरी अधिक आहे." "मला जे काही माहीत नाही त्या बाबत मी आनंदी आहे."

## मंगळवार, १० जानेवारी २०१२

फ्रान्स व व्हेनेझुएला येथील सुमारे ४० अभ्यासी दालनात जमा झाले होते. गुरुदेव आले व त्यांनी उपस्थितांना अभिवादन केले. गुरुदेवांनी विचारले, "येथे कोणी नवीन अभ्यासी आहेत का?" त्यावर काही अभ्यासींनी हात वर केले. एक अभ्यासी म्हणाला," गुरुदेव, मी ५ वर्षांपासून अभ्यासी आहे. मला नवीन अभ्यासी म्हणता येईल का?" त्यावर गुरुदेव म्हणाले, "नाही, तुम्ही एक चांगले अभ्यासी आहात." आणि यावर सर्व जण हसले. गुरुदेव म्हणाले, "मी ५० वर्षांपासून अभ्यासी आहे आणि अजूनही मला काही प्रश्न आहेत. विज्ञानाचे पारंपारिक ज्ञान शिकणे शक्य आहे पण आध्यात्मिक ज्ञान मात्र प्राप्त व्हावे लागते. ते म्हणाले, की बाबूजी ज्ञानाच्या विशाल सरोवराप्रमाणे आहेत पण नळाची तोटी उघडून ते प्राप्त करणारा कोणीही नाही.



ते म्हणाले की एका चर्चासत्रादरम्यान त्यांनी बाबूजींच्या डोळ्यांत यासाठी अश्रु पाहिले होते की बाबूजी अभ्यासींना खूप काही देऊ इच्छित होते पण ते स्वीकारण्यास लायक असे कुणीही नसल्याने त्यांना ते वातावरणामध्ये विखरुन टाकावे लागले.

"धन्यवाद व कृतज्ञता या दोघांमध्ये काय फरक आहे?" असा प्रश्न विचारला असताना गुरुदेव म्हणाले "होय, फार मोठा फरक आहे. असे बघा, कृतज्ञता ही हृदयातून येते तर धन्यवाद हा मनाकडून येत असतो."

### बुधवार, ११ जानेवारी २०१२

पूज्य गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर दहा विवाह संपन्न केले. दुपारी त्यांनी स्काईपद्वारे जम्मू येथील नवीन आश्रमाचे थेट प्रक्षेपण पाहिले. या सादरीकरणानंतर पू. गुरुदेव त्यांना म्हणाले की संपूर्ण जागा स्वत: फिरुन बघितली आहे असे त्यांना वाटले. आश्रमाचे उद्घाटन झाले आहे असे समजून अभ्यासींना ध्यानकक्ष वापरण्याची अनुमती त्यांनी दिली.

दि. १२ जानेवारी रोजी पू. गुरुदेवांनी 'गायत्री' साठी प्रस्थान केले व ते दि. १४ जानेवारी रोजी ९ वाजता परत आले.

## रविवार, १५ जानेवारी २०१२

पू. गुरुदेवांनी ओमेगा शाळेतील १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपाहारासाठी आमंत्रित केले होते. त्यानंतर गुरुदेव बाहेर उन्हात येऊन बसले. त्यांनी केवळ मुलांना त्यांच्यासमोर बसावयास सांगितले व त्यांच्याशी बराच वेळ वार्तालाप केला. ते म्हणाले, आपण केवळ यशाच्या पाठी लागू नये परंतु आपण अपयशी देखील होऊ नये. शाळेतील शिक्षण तसेच घरी व शाळेत अशा दोन्ही ठिकाणी शिकवली जातात अशी नीतिमूल्ये व नैतिकता, हे एखाद्या नदीच्या दोन्ही किनाऱ्यांप्रमाणे असावेत. दोन्ही किनाऱ्यांशिवाय नदीचे अस्तित्व असूच शकत नाही. प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे की नदीचा वेग मध्यभागी सर्वात अधिक असतो व आपण मध्यावरच असले पाहिजे, वेगाने पुढे जात असतांना, दोन्ही



किनाऱ्यांना ते जसे होते तसे मागे टाकत गेले पाहिजे.

दि. १७ जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान पू. गुरुदेव रशियनभाषिक देशांच्या व भूतपूर्व सी.आय.एस. देशांच्या अभ्यासींच्या संमेलनामध्ये व्यस्त होते. दररोज त्यांनी सिटींग व त्यानंतर भाषणे देऊन त्यांसोबत आपला वेळ व्यतीत केला. सुमारे ५०० अभ्यासींवर ते खूपच खुश असल्याचे भासत होते. गुरुदेवांनी त्यांना आपल्या कुटीरामध्ये रात्रीच्या जेवणासाठी निमंत्रित केले तसेच त्यांच्यापैकी काहींना नवीन प्रशिक्षक देखील बनविले. बंधू चक्रपाणी, कमलेश पटेल व पी. आर. कृष्णा यांनी दिलेली भाषणे आपल्या कुटिरामधून सी सी टि व्हीच्या माध्यमातून बघितली.

दि. १७ व १९ फेब्रुवारी २०१२ रोजी पू. गुरुदेवांनी सहभागींना संबोधित केले. यावेळी ते खालील विषयांवर बोलले.

### चारित्र्य

आध्यात्मिक जीवनातील हा एकमेव सर्वात महत्वाचा घटक आहे. इच्छा या बाहेरील घटक नसून आपल्या आतमध्ये आहेत. ते म्हणाले की इच्छा या कायम सुप्तावस्थेत असतात व बाहेरील घटक मिळाल्यावर योग्यवेळी त्या प्रकट होतात. या इच्छांना व मोहाला आपल्यातून साफ करणे हाच योग्य उपाय आहे. हा उपाय केवळ सहजमार्ग देऊ शकतो.

### गरजा व इच्छा

आपण आपल्या जीवनाचे संचालन करावयास शिकले पाहिजे व गरजा व इच्छांमध्ये फरक करण्याची क्षमता अंगी बाणवली पाहिजे. सर्व गरजा ह्या मूलभूत व आवश्यक असतात उदा. अन्न, वस्त्र व निवारा जे कायम पुरविले जाईल. पण इच्छांची पूर्तता होऊ शकत नाही. त्यांनी बाबूजींच्या "साधेपणाने जगा व निसर्गाशी एकरुपता राखा" या संदेशाचा संदर्भ दिला.





## त्रिची मध्ये गुरुदेव

सोमवार दि. २३ जानेवारी रोजी गुरुदेव विमानाने त्रिचीसाठी रवाना झाले. खरे म्हणजे ती एक वैयक्तिक भेट होती. परंतु गुरुदेवांनी उल्लेख केला की तेथे अनेक अभ्यासी आलेले होते, त्यावर कोणीतरी म्हणाले, " गुरुदेव, आपण सर्वांना (त्रिचीला येण्याची) परवानगी दिलीत !" याला प्रतिसाद देताना गुरुदेव म्हणाले, पहा, हे 'लॉर्ड ऑफ रिंग्ज' या चित्रपटाप्रमाणे आहे, ज्यात फ्रोडो गंडाल्फला सांगतो, "अर्ध्या शिरेंना आमंत्रण दिलेले आहे आणि उरलेले काहीही करुन येतीलच." यावर सर्वांनी हसून दाद दिली.

सुमारे १४२ विदेशी अभ्यासी गुरुदेवांसोबत होते. सुमारे ६० अभ्यासी गाडीने प्रवास करून आले होते. दि. २४ रोजी गुरुदेवांनी आराम केला. सकाळच्या कोवळ्या उन्हात बसून त्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात पक्षांच्या किलबिलाटाचा, गुळाच्या सुवासाचा आनंद घेतला. त्या तरल वातावरणाने सर्वांना भारुन टाकले व प्रत्येकाला या अद्वितीय कृपाप्रसादाचा अनुभव आला. संभाषणादरम्यान ते म्हणाले, "सर्वांनीच जर पैसे न घेण्याची व न देण्याची प्रतिज्ञा केली तर भ्रष्टाचारास वावच राहणार नाही."

दि. २५ रोजी गुरुदेवांनी सकाळचा सत्संग संचालित केला. दि. २८ जानेवारी रोजी 'जानकी' फार्ममधे बंधू गणेश व कुमारेश यांच्या व्हायोलीन वादनाचा आनंद गुरुदेवांनी घेतला. फार्ममधे वास्तव्य असताना गुरुदेवांनी नुकत्याच जन्मलेल्या दोन वासरांचे पद्मा व मरुधाम असे नामकरण केले. २९ जानेवारीला त्यांनी दोन विवाह संपन्न केले. दि. ३० जानेवारी रोजी गुरुदेव तंजावर येथे जाणार होते परंतु त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे बंधु कमलेश विदेशी अभ्यासींसोबत गेले. त्यांनी दोन सत्संगांचे संचालन केले. त्यानंतर त्यांनी आश्रमाच्या व रहिवासी वसाहतीच्या जागेवर फेरफटका मारला.

### गुरुवार ,२ फेब्रुवारी २०१२

त्रिची आश्रमात सुमारे २००० अभ्यासी पूज्य लालाजी महाराजांच्या जन्मदिनाच्या समारंभात सहभागी झाले. त्यानंतर दि. ६ रोजी गुरुदेव चेन्नईस रवाना झाले.

### परत चेन्नई

दि. ७ फेब्रुवारी रोजी गुरुदेव चेन्नईस परतले. अभ्यासींशी बोलताना त्यांनी नियतीची आपल्या आयुष्यात काय भूमिका असते याचा उल्लेख केला आणि उमर खय्यामच्या ओळी उद्धृत केल्या.





सत्संगानंतरच्या अनौपचारिक संमेलनात ते म्हणाले, "आपल्या मुलांची काळजी घ्या. कोणताही समाज, जो आपल्या मुले व स्त्रियांची काळजी घेत नाहीत्याची भरभराट होत नाही."

दि. २६ रोजी गुरुदेवांनी 'जानकी' फार्ममधे सर्व अभ्यासींच्या रात्रीच्या भोजनाचे यजमानपद भूषवले. दि. २७ रोजी गुरुदेव सकाळच्या उन्हात बसले असता त्यांनी खालील मुद्दे मांडले.

❖बाबुजींचा डावा डोळा सतत गळत असे. एकदा मी त्यांना डोळ्याची तपासणी करुन घेण्याची विनंती केली, तेव्हा ते म्हणाले की त्यांचा तो डोळा नेहमी हृदयावर असतो आणि दुसरा बाहेर.

❖वेदनेने जागृति येते, सुखाने नाही.

❖जुन्या काळी वॉल्व्ह रेडिओ असत, तेव्हा बी. बी. सी. ऐकण्यासाठी त्यांना खुप ट्युनींग करावे लागत असे. अशा प्रकारचे ट्युनींग आपण आपल्या हृदयासाठी केले पाहिजे.

'हा सर्व दिवस-रात्रींचा सारीपाट आहे, जिथे नियती मानवांना मोहरे बनवते: इथे तिथे नाचवते, जवळ घेते व ठार मारते, आणि एकामागून एक पुन्हा कपाटात ठेऊन देते.'

आपण काहीतरी ठरवतो व नियती कशी आपल्या मनसुब्यावर पाणी फिरवते हे सांगण्यासाठी गुरुदेवांनी वरील ओळी उद्धृत केल्या.


त्यांनी जेव्हा बाबूजींना सांगितले की प्रगाढ अशा सिटींगनंतर उठून कामावर जाणे फार अवघड आहे तेव्हा बाबूजी म्हणाले, "हालचाल हा शरीराचा स्थायीभाव आहे व निष्क्रियता हा आत्म्याचा". गुरुदेव पुढे म्हणाले की व्यक्तीमध्ये जेवढी आत्म्याची प्रगति होईल तेवढा आत्म्याचा स्थायीभाव तिचा ताबा घेतो व त्याला निष्क्रिय अवस्थेत राहण्यास आवडते. याची तुलना त्यांनी सहजसमाधीच्या अवस्थेशी केली ज्यात आपण भानावर असतो पण पूर्णपणे अंतर्लीन झालेले व निष्क्रिय असतो. यानंतर गुरुदेव म्हणाले, "आता मला झोपी जायला आवडेल पण त्याऐवजी मी माझी इच्छाशक्ती वापरणार आहे आणि जाऊन थोडेसे काम करणार आहे."



## बुधवार, ८ फेब्रुवारी २०१२

गुरुदेवांनी 'देवदूत आणि दानव' या पुस्तकाच्या शीर्षकाचा विनोदाने उल्लेख केला व उत्पत्तिकरिता दोघांचीही कशा प्रकारे आवश्यकता भासते हे सांगितले. त्यानंतर त्यांनी भगवान शिव कैलास पर्वतावरिल बर्फावर विराजमान असताना त्यांच्या दर्शनाकरिता ऋषि, मुनी, देव, राक्षस व दानवही कसे हजर असतात हे कथन केले. संपूर्ण विश्व भगवान शिवांचे नृत्य पाहण्यासाठी उपस्थित असते. भगवान विष्णूंबद्दल विचारणा केली असता गुरुदेव म्हणाले की विष्णू हे परोपकार व दयेचे प्रतीक असून त्यांना असे दर्शक लाभलेले नाहीत.


एका आठवड्याकरिता गुरुदेवांचे वास्तव्य गायत्री येथे होते. दि. १८ फेब्रुवारी रोजी ते मणपाक्कम येथे परतले.




"खरे आध्यात्मिक प्रशिक्षण असे असावे की जे मनाला शिस्त लावेल व नियमीतपणा आणेल, ज्ञानेंद्रियांमध्ये व मनाच्या नैसर्गिक शक्तीमध्ये संयमाची पुनर्स्थापना करेल, आणि आत्म्याला हलकेपणाचा अनुभव देईल. यामुळे आंतरिक नि:शब्दता व शांतता खात्रीपूर्वक लाभते व उच्चतम ध्येय गाठणे शक्य होते."

–बाबूजी महाराज
सत्योदय, पृष्ठ ६२


# नवीन प्रकाशने





हृदयीचे बोल २००६
मल्याळम





हृदयीचे बोल २००९
इंग्रजी



शाश्वत सत्य
तेलगु





व्हॉट इज सहज मार्ग
इंग्रजी




इटर्नल मेमोरीज– खंड १
(शाश्वत आठवणी)

पूज्य बाबूजी महाराजांच्या काही पाश्चिमात्य अभ्यासींनी घेतलेल्या अमूल्य चलतचित्रांचा हा संग्रह आहे. शहाजहानपूर येथील जीवन, बसंत उत्सव तसेच १९८२ मध्ये दिल्ली येथे साजऱ्या झालेल्या बाबूजींच्या जन्मदिवस समारंभाचे ओझरते दर्शन तसेच त्यांचा युरोपचा प्रवास अशा अनेकविध प्रसंगांचा यात समावेश आहे.





हृदयीचे बोल २००९

पूज्य गुरुदेवांनी २००९ मध्ये दिलेल्या एकूण ३४ भाषणांचा संग्रह या एम.पी.३ ध्वनिफीतीमध्ये आहे.




उत्तराधिकाऱ्याचे नामनिर्देशन


यामध्ये बंधू कमलेश पटेल यांना ३ ऑक्टोबर २०११ रोजी कोलकाता येथे गुरुदेवांचे नामनिर्देशित उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केल्याच्या घोषणेचा समावेश आहे. तसेच आपले भविष्यातील प्रतिनिधी म्हणून बंधू कमलेश यांची अभ्यासींना ओळख करुन देताना गुरुदेवांनी मुंबई, अहमदाबाद व चेन्नई येथे दिलेली भाषणे अंतर्भूत आहेत. बंधू कमलेश यांची गुरुदेवांबरोबर तसेच पूज्य बाबूजींबरोबर असणारी काही दुर्मिळ छायाचित्रे सर्वात शेवटी लहानशा 'फोटो–प्रवासाच्या' स्वरूपात प्रकाशित करण्यात आली आहेत.




इन्सान बनो

या डि.व्ही.डी. मध्ये पूज्य गुरुदेवांनी गुवाहाटी येथे ९ ऑक्टोबर २०११ रोजी दिलेल्या 'इन्सान बनो 'या भाषणाचा समावेश आहे. यानंतर गुरगाव आश्रम येथे अनौपचारिक वार्तालापादरम्यान नवी दृष्टी देणाऱ्या सत्राचा समावेश आहे. हिंदीमध्ये केलेल्या या दोन्ही भाषणात पूज्य गुरुदेवांनी बंधू कमलेश पटेल यांची 'आपले आध्यात्मिक उत्तराधिकारी' म्हणून उपस्थित अभ्यासींना ओळख करुन दिली आहे.

# १४० वा जयंती समारंभ




"म्हणून हे सत्यशोधकांनो, जर तुम्ही खरोखरच आनंदाच्या शोधात असाल तर अंतर्मुख होण्याचा प्रयत्न करा; तुमच्या आत्म्यामध्ये आनंदाचा शोध घ्या; आत्म्याच्या अवस्थांचे ज्ञान प्राप्त करा; सत्याचे शोधक बना आणि पहा तुम्हाला चिरस्थायी आनंद प्राप्त होईल."

पूज्य लालाजी महाराज

कंप्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र (लालाजी) पृष्ठ २९३


बेंगलोर

## कर्नाटक

बेंगलोरच्या 'परमधाम' आश्रमात सुमारे १२०० अभ्यासी पूर्ण दिवसीय कार्यक्रमाकरिता अत्यंत उत्साहाने उपस्थित होते. प्रथम सत्रात व्याख्यानांनंतर विविध उद्धरणांवर प्रश्नमंजूषेचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये अभ्यासींना आत्मपरिक्षण करुन त्यांना विचारलेल्या उद्धरणांमधून काय समजले हे स्पष्ट करायचे होते. 'स्वत:मधील परिवर्तनास सहाय्यभूत होण्यासाठी अभ्यासींनी आत्मपरिक्षण केले पाहिजे' हाच या दिवसाचा मुख्य विषय होता.

हुबळीमधील कार्यक्रमात बेळूर, धारवाड, गदग, नवलगुंद, नवनगर, पुडकलकट्टी आणि सिरसी ह्या केन्द्राच्या २२५ अभ्यासींनी सहभाग घेऊन विक्रमी उपस्थिती नोंदविली. "ते, हुक्का आणि मी" या ग्रंथावर आधारित DVD दाखविण्यात आली. त्यानंतर "कंप्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र (लालाजी)" यामधील विषयांवर अभ्यासींनी भाषणे दिली. त्यानंतर भजने व प्रश्नोत्तर सत्र झाले. युवा अभ्यासींनी सादर केलेल्या 'द्रौपदी गर्वहरण' या विनोदी नाटकाने कार्यक्रमाची रंगत वाढविली. त्यानंतर सत्संग होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण वातावरण असे होते की कित्येकांना आश्रम सोडून जावेसेच वाटत नव्हते.


अलुवा


हुबळी

## केरळ

एर्नाकुलम व इड्डिकी जिल्ह्यामधील अभ्यासी अलुवा येथे सत्संगासाठी जमले होते. सत्संगानंतर लालाजी महाराजांच्या जीवनावरील छोटेखानी भाषण व नाटिका सादर करण्यात आली. विविध केन्द्रातील अभ्यासी व प्रशिक्षकांनी लालाजी महाराजांविषयीचे आपले अनुभव कथन केले व आपली मते मांडली. बंधू इ.राधाकृष्णन यांनी आश्रमाविषयी एक कविता सादर केली.

कासारगोड मध्ये युरोपियन परिषदेवर आधारित 'हेवन'(स्वर्ग) हा अनुबोधपट दाखविण्यात आला. त्यानंतर भाषणे, स्वर्णिम शांती, भजने व लालाजी महाराजांवरील एका छोट्या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे शेवट सत्संगाने झाला.

गुलबर्गा व बिदरच्या जवळपासच्या केंद्रातील सुमारे ३०० अभ्यासी हुमनाबाद येथे जमले होते. स्थानिक अभ्यासींनी समारंभाची उत्कृष्ट व्यवस्था केली होती. बरेच अभ्यासी लालाजी महाराजांविषयी बोलले. मुलांनी भरतनाट्यम नृत्य तर बंधू एस. ए. काझी व त्यांच्या समूहाने बासरी वादनाचा कार्यक्रम सादर केला.


हुमनाबाद

# एकोज इंडिया वार्तापत्र


श्री गंगानगर


जोधपुर


अलवार

## राजस्थान

श्री गंगानगर येथे १२० अभ्यासी बंधू पारस परीख यांच्या घरी जमले होते. सत्संगानंतर पूज्य लालाजी महाराजांच्या चरित्राचे वाचन करण्यात आले. बंधू मुंशीलाल यांनी भंडाऱ्यादरम्यान तसेच आपल्या वैयक्तिक जीवनात अनुशासन कसे पाळावे आणि सहनशीलता कशी वाढवावी या बाबत विवेचन केले. लालाजी महाराजांच्या जीवनावरील एक ध्वनि-चित्रफीत दाखविण्यात आली. भोजनोत्तर "सच्चा प्यार" व "प्यार बढाइए" या गुरुदेवांच्या हिन्दी भाषणांची चित्रफीत उपस्थितांना पाहता आली. प्रत्येक अभ्यासी खुल्या दिलाने या कार्यक्रमात सहभागी झाला. केंद्रप्रमुख बंधू मुन्शी यांनी अभ्यासींना रविवारच्या सत्संगास व भंडाऱ्यांस नियमितपणे उपस्थित राहण्याविषयी प्रोत्साहित केले.

जोधपूर आश्रमातील कार्यक्रमात ३८५ अभ्यासी ६२ मुले सहभागी झाली होती. "गुरु-शिष्य संबंध" या विषयावरील सुरचित नाटकाचे सादरीकरण काही अभ्यासींनी केले. मुलांनी अत्यंत उत्साहाने व प्रेमाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. लालाजी महाराजांच्या जीवनावरील एक अनुबोधपट दाखविण्यात आला व त्यानंतर सत्संग संचालित करण्यात आला.

अलवार आश्रमात १९० अभ्यासींनी संपूर्ण दिवस सत्संग, मुलांसाठी क्रीडा सत्र, अभ्यासींसाठी 'एक मिनिट वक्तृत्व सत्र' इत्यादि उपक्रमांमध्ये व्यतीत केला. अनेक चारित्र्य मूल्यांचे मूर्तिमंत उदाहरण असलेल्या लालाजी महाराजांच्या जीवनाचे स्मरण करण्यात आले. गुरुदेव ज्यांना सतत महत्त्व देत असतात ती 'निस्वार्थ प्रेम' व 'सेवा' ही या दिवसाची प्रमुख तत्वे होती.

भिलवाडा आश्रमात शाहपूरा, गंगापूर, सिक्कर, बिजयनगर, बनेडा अशा अनेक गावांतून सुमारे १०० अभ्यासी जमले होते. सत्संगानंतर लालाजी महाराजांच्या जीवनकथेचे सादरीकरण तसेच काही भजने सादर करण्यात आली. पूज्य लालाजी महाराजांची शिकवणूक व त्यांच्या जीवनातील प्रेरणादायक प्रसंगांचे काही अभ्यासींनी त्यांच्या पुस्तकांतून वाचन केले. युवा अभ्यासींनी 'आज्ञापालन' नावाची एक नाटिका सादर केली.

## महाराष्ट्र

मुंबई येथील पनवेल आश्रमामध्ये जवळ जवळ ६०० अभ्यासी जमले होते. नाटक, ग्रंथ वाचन व भजने ह्या मधून लालाजी महाराजांच्या आयुष्यातील विविध प्रसंगांवर प्रकाशझोत टाकल्याने त्यांच्या जीवनाचे एक छोटेसे रेखाचित्रच तयार झाले. भोजनोत्तर लालाजी महाराजांच्या जीवनावरील एक चित्रपट दाखविण्यात आला.

पुणे येथे सत्संग, सकाळचे जेवण, भजन इत्यादि कार्यक्रमानंतर सत्संगाकडे गंभीरपणे पाहण्यासंबंधी गुरुदेवांची एक चित्रफीत दाखविण्यात आली. "शाश्वत सत्य" मधुन संग्रहित केलेल्या काही कात्रणांच्या आधारे, लालाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सादरीकरण करण्यात आले. पूज्य लालाजींच्या जीवनावर आधारित चित्रपटातील काही लघु-चित्रफीती दाखविण्यात येत होत्या व प्रत्येक लघु-चित्रफीतीनंतर अभ्यासींना आत्मपरिक्षण करण्यासाठी व आपली मते मांडण्यासाठी वेळ दिला जात होता.

लालाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वातील सूक्ष्मतर पैलूंवर अभ्यासींनी प्रकाशझोत टाकला अणि प्रस्थापित केले की, ते (लालाजी महाराज) सर्वांसाठी समान होते. लालाजी महाराजांच्या ऐहिक व पारलौकिक जीवनामध्ये समतोलाची गुंफण अत्यंत सुंदरतेने विणलेली होती. संध्याकाळच्या सत्संगापूर्वी भरतनाट्यम नृत्य सादर करण्यात आले.

औरंगाबाद जवळील लासूर येथे जवळपासच्या केंद्रांमधून सुमारे १५० अभ्यासी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. बंधू संजय भाटियांनी सहजमार्गामुळे त्यांच्या आयुष्यावर पडलेल्या प्रभावाविषयी मनोगत व्यक्त केले तर भगिनी अनुसूया यांनी रविवारच्या सत्संगाचे महत्त्व विषद केले. बंधू सुनिल चंद्रन ह्यांनी गुरुंचे महत्व ह्या विषयावर मंत्रमुग्ध करणारे सादरीकरण प्रस्तुत केले. शेवटी सायंकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आसाम

गुवहाटीमध्ये कार्यक्रमाची सुरुवात सत्संगाने झाली. त्यानंतर लालाजी महाराजांच्या साध्या राहणीबद्दल व ते आपल्या घरगुती समस्या कशा हाताळत ह्या विषयी भाषण झाले. एकोज वार्तापत्राच्या जानेवारी अंकावर आधारित एक प्रश्नमंजुषा घेण्यात आली. त्यामुळे अभ्यासींना एकोज वार्तापत्र वाचण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात आली होती.


पुणे


मुंबई


गुवहाटी



मिर्झापूर



लखनौ

## उत्तर प्रदेश

लखनौ आश्रम येथे सुमारे ५०० अभ्यासी उपस्थित होते. सत्संगानंतर पूज्य लालाजींच्या आयुष्यावर आधारित कथेचे वाचन करण्यात आले. त्यानंतर दाखविण्यात आलेल्या चित्रपटामुळे उपस्थितांना स्वत:च्या आयुष्याचे आत्मनिरिक्षण करण्याची प्रेरणा मिळाली. या वेळी भगिनींनी भजने गायली व मुलांनी नृत्याचा कार्यक्रम प्रस्तुत केला. 'आयुष्यात जे काही घडते ते फक्त चांगल्याकरिताच असते' या विषयावर युवकांनी एक नाटक सादर केले. आश्रमातील वातावरण तरल व कृपाप्रसादाने भारलेले होते. कृपेने शिगोशीग भरलेल्या हृदयांनी अभ्यासी आपापल्या घरी परतले.

मिर्झापूर येथे आश्रमासाठी घेतलेल्या जागी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अलाहाबाद विभाग–प्रमुख बंधू आर.आर.के.त्रिवेदी या वेळी उपस्थित होते. या वेळी काही प्रशिक्षकांची भाषणे झाली. सांस्कृतिक कार्यक्रम व गुरुदेवांची चित्रफीत दाखविल्यानंतर सत्संगाने या सत्राची समाप्ति झाली.

## ओरिसा

कटक येथील कार्यक्रमात सुमारे १३६ अभ्यासी सहभागी झाले होते. मनुष्यजातीच्या आध्यात्मिक उन्नतिसाठी पूज्य गुरुदेव लालाजी महाराजांच्या शिकवणुकीवर आधारित चर्चेकरिता सत्संगानंतर अभ्यासी एकत्र आले. या उत्कंठापूर्ण चर्चेमध्ये युवक अभ्यासींचा सहभाग उल्लेखनीय होता. प्रशिक्षक–सभा, ओपन हाउस (१५ व्यक्तींकरिता) तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही या वेळी आयोजन करण्यात आले होते.

## तामिळनाडू

तिरुप्पुर येथील डायमण्ड ज्युबिली पार्क, तिरुप्पुर व जवळपासच्या केंद्रांतून आलेल्या सुमारे ७५० अभ्यासींनी भरून गेला होता. तीनही गुरुदेवांवर आधारित भाषणे, सादरीकरणे व सत्संग यामुळे आसमंत मंगलमय झाला होता. गुरुदेवांच्या जीवनाला तरलतेने, मृदूतेने स्पर्श होत असताना अभ्यासींची हृदये त्याचा प्रतिसाद देताना एकत्रितपणे कंपित होत होती. सुग्रास नाश्ता, भोजन व चहासोबतच्या खाद्यपदार्थांनी उपस्थित अभ्यासींची सरबराई करण्यात आली. गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने संपूर्णत: भरलेल्या हृदयांनी अभ्यासी आपापल्या घरी परतले.



तिरुप्पुर

## उत्तराखंड

काशीपूर केंद्रामध्ये सत्संगानंतर पूज्य लालाजींच्या आयुष्यावर एक भाषण झाले. लालाजींच्या जीवनातील गुणांवर चर्चा करण्यासाठी सुमारे ४५ उपस्थित अभ्यासींना गटांमध्ये विभागले गेले. विविध गटांनी आपापले मुद्दे मांडल्यानंतर स्पष्टीकरणाचे सत्र झाले. दिव्य गुरुदेव लालाजींच्या सतत स्मरणामुळे त्यांच्याप्रति विस्मय, प्रगाढ आदर आणि प्रेम यांनी सर्व उपस्थित अभ्यासींची हृदये ओतप्रोत भरली. दुपारच्या भोजनानंतर भजने व साधनेसंबंधी स्पष्टीकरणाचा कार्यक्रम झाल्यानंतर सत्संगाने या दिवसाची सांगता झाली.

## झारखंड

हजारीबाग व चत्रा या केंद्रांमधील सुमारे ३० अभ्यासी पूर्ण दिवसाकरिता चत्रा येथे जमले होते. या वेळी प्रश्नोत्तरांचे सत्र आयोजित करण्यात आले होते.

रांची केंद्राला संपूर्ण दिवसीय कार्यक्रमासाठी सुशोभित करण्यात आले होते. पूज्य लालाजींच्या आयुष्यावर आधारित चित्रपट दाखविल्यानंतर काही भजने गाण्यात आली.

जमशेदपूर येथे सुमारे ३८ अभ्यासी उपस्थित होते. 'शाश्वत सत्य' या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन करण्यात आले. एक भाषण व त्यानंतर प्रश्नोत्तरांच्या सत्राचा कार्यक्रम झाला.



काशीपूर



कटक

# आश्रम विकास

## जम्मू आश्रम



जम्मू आश्रम


पय्यानूर आश्रम

जम्मू आश्रम हा भारताच्या सर्वात उत्तरेकडील राज्यात म्हणजेच जम्मू–काश्मीर मध्ये उभारण्यात आलेला पहिलाच आश्रम व केंद्र होय. रंजितपूर या गावी, गोल–गुजराल, जम्मू येथे, रेल्वे स्टेशनपासून दहा कि.मी., विमानतळापासून अकरा कि.मी. व बस थांब्यापासून सहा कि.मी. अंतरावर हा आश्रम वसलेला आहे.

दि. २ फेब्रुवारी २०११ रोजी आश्रमाकरिता जमिनीची खरेदी करण्यात आली व सुमारे २८०० चौ. फूटाचे स्वयंपाकघर व भोजनकक्ष बांधून तयार झाला. ध्यान–कक्षाच्या उभारणीपर्यंत ह्या जागेचा ध्यान–कक्ष म्हणून वापर करण्यात येणार आहे.

जम्मू आश्रमाची छायाचित्रे व व्हिडियो चित्रफीत असलेले सादरीकरण पूज्य गुरुदेवांनी त्यांच्या चेन्नई कार्यालयात दि. ११ जानेवारी २०१२ रोजी पाहिले आणि ते म्हणाले, 'मी या आश्रमात प्रवेश केला असून आश्रमाचे उद्घाटन झाले आहे. या कक्षामध्ये ध्यानाची सुरुवात आजपासूनच करावी.' त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता या आश्रमात सत्संगाचे संचालन करण्यात आले व त्यानंतर नियमीतपणे सत्संग करण्यात येऊ लागला.


थरवई आश्रम



## थरवई, उत्तर प्रदेश

अलाहाबाद केंद्रापासून १३ कि.मी. अंतरावर असणाऱ्या थरवई येथील काही व्यक्तींना १९८३ मध्ये सहज–मार्गाची ओळख करुन देण्यात आली व ते अलाहाबाद येथे सत्संगाकरिता जात असत. प्रशिक्षक बंधू एल.के.त्रिपाठी व बंधू सुभाष चंद्र मिश्रा यांच्या प्रयत्नाने दि.२२ मार्च रोजी २००६ सुमारे ८०० चौ. मीटर जमिनीची खरेदी व नोंदणीकरण करण्यात आले.

स्थानिक आमदार व खासदारांच्या ऐच्छिक मदत–निधीतून १००० चौ. फुटांचा (२५' गुणीले ४०') ध्यान–कक्ष बांधण्यात आला व बाकीच्या सोयी–सुविधांकरिता अभ्यासींकडून देणगीरूपाने निधी जमविण्यात आला. बंधू उमा शंकर वाजपेयी, सचिव, यांच्या हस्ते ११ डिसेंबर २०११ रोजी ध्यान–कक्षाचे औपचारिक उद्घाटन झाले. या वेळी त्यांनी सत्संगाचे संचालन केले. अलाहाबाद तसेच आजूबाजूच्या केंद्रातील अनेक अभ्यासी उद्घाटन समारंभाला उपस्थित होते.

## पय्यानूर आश्रम, केरळ

कन्नूर तालुक्यामध्ये, पय्यानूर–चिमेणी मार्गावर, पय्यानूर पासून १० कि.मी. अंतरावर हा आश्रम वसलेला आहे. रमणीय निसर्गाच्या सान्निध्यात वसलेली ही सुंदर जागा २००७ मध्ये खरेदी करण्यात आली व अभ्यासींनी मिशनला अर्पण केली. आश्रमाच्या जागेजवळच अभ्यासींनी निवासी गृहसंकुल तयार केले आहे. सुमारे १०० अभ्यासींची सोय होऊ शकेल असा तात्पुरता ध्यान–कक्षही उभारण्यात आला आहे. सध्या ६० ते ७५ अभ्यासी रविवारच्या सत्संगाकरिता नियमीतपणे हजर असतात.

दि. २९ जानेवारी २०१२ रोजी सत्संगानंतर सुमारे ७५ अभ्यासींच्या उपस्थितीत विभाग–प्रमुख बंधू कुन्नीकन्नन यांनी स्वयंपाकघर व प्रसाधन–कक्षाचा शिलान्यास केला. त्यानंतर सर्वांनी ध्यान केले. मोठ्या ध्यान–कक्षाची व गुरुदेवांच्या कक्षाची उभारणी करण्यासाठी योजना बनविण्यात येत आहे.

## शिक्षक विकास कार्यक्रम – २

बनशंकरी आश्रम, बेंगलोर



बनशंकरी आश्रम, बेंगलोर येथे या कार्यक्रमाचे तीन टप्प्यांमध्ये (१६ ऑक्टोबर, ५–६ नोव्हेंबर, २६–२७ नोव्हेंबर २०११) आयोजन करण्यात आले होते. ३६ सहभागी अभ्यासींची साधना दृढ करणे, त्यांचा आणि पूज्य गुरुदेवांचा दुवा मजबूत करणे, त्यांना सहज मार्गाचे सखोल ज्ञान देणे आणि अध्यात्मासाठी उत्सुक असणाऱ्यांबरोबर सहज मार्गाच्या ठळक वैशिष्ट्यांविषयी सुसंवाद साधण्यासाठी प्रशिक्षण देणे ही या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे होती.

हे प्रशिक्षण गटचर्चेपासून सुरु होऊन ते एखाद्या निवडक विषयावर अभ्यासींच्या समूहाशी संवाद साधणे अशा प्रकारे देण्यात आले. त्यानंतर प्रशिक्षणार्थी एखाद्या निवडक उद्धरणाच्या अर्थाबद्दल व्यासपीठावर येऊन २/३ मिनिटे बोलले. शेवटी त्यांना निवडलेल्या एका विषयावर वेगवेगळ्या लुटूपुटूच्या समूहांशी (अभ्यासी, विद्यार्थी, गृहिणी इत्यादि) सुमारे २० मिनिटे बोलण्यास सांगितले गेले. सहभागी झालेल्यांची स्वतःचे विचार मांडण्याची क्षमता, त्यांचे सुसंवादाचे कौशल्य या सगळ्यांचे प्रशिक्षण समितीच्या सदस्यांनी परीक्षण करून त्यात सुधारणेसाठी काही सूचना दिल्या.

या कार्यक्रमाचे आयोजन बंधू बी. श्रीनिवासा यांनी केले होते. त्यांना या कामात बंधू जी. सुब्रमण्या, बंधू कृष्णमूर्ती, बंधू प्रभाकर, बंधू सत्यनारायणा तसेच भगिनी माधुरी यांनी मदत केली.


## क्रीडा दिन

जयपूर, राजस्थान

दि. १ जानवारी २०१२ रोजी जयपूर केंद्राने क्रीडा दिनाचे आयोजन केले होते. अभ्यासींमध्ये एकीची भावना निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सुमारे १२० अभ्यासी सहभागी झाले होते. दोरीच्या उड्या मारणे, रस्सी खेच, ज्येष्ठ नागरिकांसाठी शर्यत इत्यादि खेळ खेळण्यात आले. जिंकलेल्यांना व शिस्तबद्ध वागणूक असणाऱ्या मुलांना बक्षीसांचे वाटप करण्यात आले. वर्षाच्या पहिल्याच दिवशी आयोजित केलेल्या या पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमामुळे सर्वांमध्ये खिलाडू वृत्ती , बंधुभाव आणि अनुशासन वाढीस लागण्यास मदत झाली.

## युवा कार्यशाळा – साधना, ध्येय आणि आकांक्षा

हैद्राबाद




दि. १० ते १२ फेब्रुवारी २०१२ या दरम्यान झोनल आश्रम, हैद्राबाद येथे झालेल्या या कार्यशाळेत ५५ अभ्यासी व १२ प्रशिक्षक सहभागी झाले होते. गुरुदेवांची उद्धरणे, रीट्रीट सेंटरचे फोटो यामुळे प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण झाले होते.

पहिले सत्र साधना व दैनंदिनी लिहिण्याविषयी होते. यानंतर सर्वांनी वैयक्तिक सिटिंग घेतले. सहभागी झालेल्यांनी प्रशिक्षकांसोबत काही काळ घालवून स्वतःच्या रोजच्या साधनेत येणाऱ्या अडथळ्यांवर उत्तर शोधले.

वाचनासाठी व मनन करण्यासाठी शनिवारी गुरुदेवांच्या दोन भाषणांची पत्रके देण्यात आली. जेवणानंतर अभ्यासींनी काही खेळ खेळले. त्यामुळे त्यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला.

बंधू मल्लीक यांनी सहभागींना संबोधित केले. त्यानंतर "ध्येय" या विषयावर बंधू बालाजी यांनी भाषण केले. नंतर सहभागी झालेल्यांनी सहज मार्गाचे ध्येय या विषयावर आपापले विचार मांडले व ध्येयाबद्दलची त्यांची समज त्यांच्या साधनेबरोबर कशा प्रकारे विकसित झाली हेही सांगितले. रात्रीच्या भोजनानंतर व्हिडियो सी.डी. दाखविण्यात आली.

रविवारी या कार्यक्रमाचा मुख्य पैलू होता– चारित्र्याच्या जपणुकीचे महत्त्व. पूज्य गुरुदेवांनी 'चारित्र्याची जपणूक' या विषयावर नुकत्याच दिलेल्या भाषणाची पत्रके सर्वांना देण्यात आली. भगिनी अर्चना यांनी आपल्या आकांक्षाना पूरक ठरतील असे सोपे, सहज बदल करून आपले जीवन कसे घडवावे यावर एक परस्पर–संवादी सत्र संचालित केले.

दुपारी गुरुदेवांची चित्रफीत दाखविण्यात आली. त्यानंतर निःशब्द आत्मनिरीक्षण करण्यात आले. या कार्यक्रमाचा प्रतिसाद अतिशय उत्तम होता. सहभागी झालेल्यांनी अशा कार्यक्रमाचे वारंवार आयोजन करण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली.



# निबंध स्पर्धेच्या प्रशस्तिपत्रकांचे वितरण

## अहमदनगर

दि. ११ फेब्रुवारी रोजी निबंध स्पर्धा समितीच्या सदस्यांनी सहभागी शाळांना भेटी दिल्या व पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रके वितरीत केली. त्यांनी यशस्वी मुलांचा सत्कार करण्यासाठी श्री शिवाजी सैनिक शाळा व शिवशंकर विद्यामंदिर या शाळांना भेटी दिल्या. यावर्षी अहमदनगर केंद्राने दोन झोनल पातळीवरची बक्षिसे मिळविली. सहजमार्ग साधना पद्धतीबाबत उत्सुकता दाखविणाऱ्या शिक्षकांसाठी खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

## नाशिक

दि. ११ फेब्रुवारी या दिवशी सहभागी झालेल्यांसाठी व बक्षिस मिळविणाऱ्यांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दहा विद्यार्थी आपल्या पालकांसोबत यात सामील झाले होते. एस. आर. सी. एम. बद्दल देण्यात येत असलेली माहिती सहभागी झालेल्या ३० व्यक्ती अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होत्या. युवकांमध्ये योग्य रितीने जीवन जगण्याबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या मिशनच्या परिश्रमांचे आणि भूमिकेचे त्यांनी कौतुक केले. बंधु टांक यांनी बक्षिसांचे वितरण केले. स्पर्धेत बक्षिसे मिळविणाऱ्यांना "गुरुदेव मला सांगा" ची एक प्रत व एक पेन भेट म्हणून देण्यात आले.



## बेंगलोर

बनशंकरी आश्रमात झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिक मिळविणारा विद्यार्थि– मेंगलोरची १६ वर्षीय यशस्वी नायक म्हणाला, "जेव्हा माझे वडील बाहेरगावी जात, तेव्हा मला रोज पूजेची कर्मकांडे करावी लागत व मला वाटत असे की, हेच अध्यात्म आहे. पण आज इथे येऊन आणि तुम्हा सगळ्यांचे ऐकून मला लक्षात आले की, अध्यात्म म्हणजे मानवतेची सेवा आहे."

एकूण ११ पारितोषिके मिळविणाऱ्या शिक्षण संस्थांमधून सुमारे ३० व्यक्ती उपस्थित होत्या. दक्षिण कर्नाटक झोन मधून एकूण ३३० संस्थांमधून सुमारे ३३०० विद्यार्थी या निबंध स्पर्धेत सामील झाले होते.





# बी. एम. ए . चा ८वा वर्धापनदिन समारंभ

### कोलकता,प. बंगाल

### २४ डिसेंबर २०११

कुडकुडत्या थंडीत सकाळी दुर्गापूर, बोंडाल, फरक्का, झारखंड राज्य आणि कोलकत्यामधील ७० अभ्यासी हा सोहळा संपन्न करण्यासाठी जमले होते. सकाळचे सत्र 'ध्यान' या विषयावर आधारित होते तर संध्याकाळचे सत्र 'शुद्धीकरण' या विषयावर होते. सहभागी झालेल्यांना आपल्या अंतरंगातील दिव्य प्रकाशाशी नाते जोडण्याकरिता पाच मिनिटे ध्यान करण्यासाठी सांगितले गेले. त्यानंतर त्यांना ५ गटांमध्ये विभागण्यात आले. प्रत्येक गटप्रमुख म्हणून एका संयोजकाची नियुक्ति करण्यात आली होती. दहा सूत्रांचे व त्यावरील निवडक भाष्यांचे वाचन करून त्यांच्या





गर्भितार्थावर विचार करण्यास प्रत्येक गटास सांगितले गेले.

बालक केंद्राने मुलांच्या करमणुकीसाठी विविध विधायक उपक्रमांचे आयोजन करून त्यांना व्यग्र ठेवले होते.

### २५ डिसेंबर– मुलांकरिता क्रीडादिन

रविवारच्या सत्संगानंतर बालक केंद्राने वार्षिक क्रीडादिनाचे आयोजन केले होते. मुले, प्रौढ, आणि आजी–आजोबांनीसुद्धा यात सामील होऊन या कार्यक्रमाचा आनंद लुटला. जेवणानंतर पारितोषिके वितरीत करण्यात आली. दिवसाची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली. सहभागी झालेल्यांनी आठवड्याचा सुट्टीचा दिवस मजेत घालविला व साधना नियमित करण्याचा निश्चय करून नवी ताजीतवानी सुरुवात केली.

## चरित्र निर्माण कार्यशाळा

बिकानेर, राजस्थान



२०१२ या वर्षातील पहिला दिवस अभ्यासींनी 'चारित्र्य निर्माणाचे महत्व' या विषयावर अर्ध्या दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा केला. सहभागी अभ्यासींना तीन गटांमध्ये विभागण्यात आले व प्रत्येक गटाने चारित्र्य निर्माणाच्या चार पैलूंवर लक्ष केंद्रित केले. यामध्ये वागणूक, प्रेम, विनम्रता, त्याग, इ. मुद्यांचा समावेश होता. त्यानंतर प्रत्येक गटातील एका प्रतिनिधीने त्यांच्या गटाच्या चर्चेचा सारांश प्रस्तुत केला. समाजात आणि या भौतिक जगात वावरताना आपल्या प्रेमाने, त्यागाने व स्व–परिक्षणाने अभ्यासींनी काय प्रतिबिंबीत करावे अशी पूज्य गुरुदेवांची अपेक्षा आहे, याविषयीचे मुद्दे चर्चेमध्ये आले. बंधू मान सिंग इंडा यानी 'स्व-मूल्यमापनातून नकारात्मकता कशी घालवावी' या विषयावर उपस्थितांना संबोधित केले. बंधू अनिलकुमार यांनी बंधू कमलेश पटेल यांचे 'समर्पणाच्या भावनेचे गुणविषेश व पूज्य गुरुदेवांच्या आपल्याप्रति असलेल्या प्रेमाला आपण कसा प्रतिसाद द्यावा' या विषयीचे पत्र वाचून दाखवले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची समाप्ती झाली.

## मुद्रण रचना कार्यशाळा, मुंबई

मुद्रण रचना या विषयावरील २ दिवसांची कार्यशाळा दि.३१ डिसेंबर २०११ आणि १ जानेवारी २०१२ या दिवशी विभागीय आश्रम, पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. ज्या स्वयंसेवक अभ्यासींना मिशनसाठी माहिती पत्रके, भित्तीपत्रके, पुस्तके इ. बनविण्यात रस आहे अशांसाठी प्रशिक्षण असे याचे स्वरूप होते. मुंबई ,जळगाव, नाशिक आणि पुणे येथील १५ अभ्यासी यात सहभागी झाले होते.

कार्यशाळेमध्ये रचनेची मूलभूत तत्वे आणि रचनेचा आराखडा (डिझाईन लेआऊट) तयार करताना त्यांचा उपयोग करण्याचे महत्त्व याविषयी माहिती दिली गेली. सहभागी अभ्यासींना डिजिटल आर्टवर्क बनवण्यासाठी लागणाऱ्या सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यानुभव केंद्रित अशा सत्रांमध्ये रचनेच्या तत्वांचा उपयोग करून एक भित्तीपत्रक बनविण्यास सांगितले गेले. या कार्यशाळेला सहभागी अभ्यासींनी उत्तम प्रतिसाद दिला. तसेच या विषयावर काम करणाऱ्या अभ्यासींच्या संख्येत वाढ झाल्याने मिशनला भाविष्यात लाभ होईल.

## तणाव व्यवस्थापन चर्चासत्र

जयपूर, राजस्थान

दि. ८ जानेवारी २०१२ रोजी HDFC life च्या स्थानिक कार्यालयात या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. HDFC life चे सर्व शाखा व्यवस्थापक यामध्ये सहभागी झाले होते. ध्यानाच्या माध्यमातून मनाचे नियंत्रण करून तणाव व्यवस्थापन कसे करावे हे जाणून घेण्याबरोबरच सहजमार्ग आपल्याला काय देऊ शकतो हे त्यांना शिकायचे होते.

या सत्राचे नियोजन बंधू संदीप नय्यर यांनी केले तर सत्र संचालन जयपूर केंद्राचे केंद्रप्रमुख बंधू मनोज नागर यांनी केले. सध्याच्या स्पर्धात्मक आयुष्यात ध्यान कसे उपयुक्त आणि हितकारी आहे याचे त्यांनी विवरण केले.

हे सत्र परस्पर–संवादी असल्याने प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अनेक शंकांचे निरसन होत गेले. या चर्चासत्रामुळे सर्वांना चांगले मार्गदर्शन मिळाले.

## स्पेक्ट्रम स्पिरिच्युअल क्लबची नांदेड आश्रमाला भेट



दि.२७ जानवारी २०१२ रोजी स्पेक्ट्रम स्पिरिच्युअल क्लबच्या १५ महिलांनी सहजमार्गाबद्दल माहिती घेण्यासाठी नांदेड आश्रमाला भेट दिली.

भगिनी शुभदा आपटे यांनी प्रश्न उत्तराच्या सत्राचे संचालन केले. यावेळी सहभागी महिलांनी अर्थगर्भ अशी उत्तरे दिली.

यानंतर भगिनी सुरभी आणि भगिनी वैद्य यांनी सहजमार्गाची माहिती सर्वांना विस्तृतपणे सांगितली आश्रमामधील वृक्षांच्या सावलीमध्ये स्वयंपाकगृहातील अभ्यासी स्वयंसेवकांनी बनविलेल्या स्वादिष्ट भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# प्रकाशाचे केंद्र

## गुलबर्गा आश्रम

### बाबूजींद्वारे पेरलेले बीज

गुलबर्गा हे उत्तर कर्नाटकातील विभागीय मुख्यालय असलेले शहर आहे व बहामनी राजवटीचे उगमस्थान देखील आहे. सन १९५७ मध्ये मिशनने येथे आपली सुरुवात केली. कै.बंधू एस. ए. सारनादजी हे सुरुवातीस या केंद्रात आलेल्या काही मोजक्या अभ्यासींच्या समूहातील एक होते. नंतर कित्येक वर्षे त्यांनी मिशनचे सचिव म्हणून सेवा केली.

सन १९५७, १९६३ व १९६८ मध्ये या केंद्राला भेटी देऊन बाबूजी महाराजांनी या केंद्राचे संवर्धन केले. दि. १५ डिसेंबर १९५७ रोजी गुलबर्गा येथील वार्षिक उत्सवामध्ये संदेश देतांना बाबूजींनी सहजमार्गाची प्रेमपूर्वक फोड करुन सांगितली ती याप्रमाणे "..माझ्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारावर प्रत्येकाला अगदी सहज अनुसरता येईल अशी एक साधी प्रक्रिया मी सुचवू इच्छीतो. जर कुणी आपले हृदय विकू शकले म्हणजेच ते आपल्या दिव्य गुरुदेवांना भेटस्वरुप देऊ शकले तर आणखीन काही करण्याचे शिल्लकच रहात नाही. हे त्याला नैसर्गिकरित्या अनंत सत्यामध्ये विलीन होण्यास सहज मदत करेल."

### आश्रम व त्यांतील कार्यक्रम

ह्या केंद्रामध्ये आता सुमारे ४५० अभ्यासी आहेत व रविवारच्या सत्संगासाठी सुमारे १७० अभ्यासी नियमीत उपस्थित असतात. दि. २४ मार्च १९९३ रोजी गुरुदेवांनी रेल्वे स्थानकापासून ५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या सेडम रोडवरील या आश्रमाचे भूमीपूजन केले होते तसेच दि. १३ मे १९९४ रोजी याचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले होते. या दुमजली इमारतीचे क्षेत्रफळ सुमारे १८००० चौ.फूट असून यामध्ये ३०० अभ्यासी बसण्याच्या क्षमतेचा ध्यानकक्ष, निवासकक्ष, कार्यालय, स्वयंपाकघर, प्रसाधन कक्ष, पूस्तक विक्री केंद्र व वाचनालय आहे. दर रविवारी तसेच मंगळवार, बुधवार व गुरुवारी संध्याकाळी सत्संग होत असतो. शुक्रवारी व शनिवारी संध्याकाळी वैयक्तीक सिटींग्ज होतात. समर्पित स्वयंसेवकांचा समूह सतत मिशनच्या अनेकविध कार्यक्रमांमध्ये क्रियाशील असतो.

### समर्पणाचे गुपित

या केंद्राच्या व आश्रमाच्या संवर्धनामध्ये गुरुदेवांनी सन १९८४, १९८७, १९८९, १९९०, १९९३, १९९४, १९९८ व २००२ मध्ये भेटी देऊन सक्रिय भूमिका निभावली. त्यांच्या शेवटच्या भेटीत गुरुदेवांनी समर्पणाचे गुपित व आध्यात्मिक प्रगती म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून गुरुदेवांसाठी काम करणे होय हे उघड केले. " शरणागती हा एक शब्द आहे पण आवश्यक असणारी सर्व प्रवृत्ती त्यांत सामावली आहे. हा सगळ्यात सोपा मार्ग आहे, मी निवडलेला मार्ग तुम्हांस माहितच आहे, मी त्यांचे काम करत गेलो व त्यानेच काम होत गेले."

### भविष्य

सेदम रोड वरच काही अंतरावर गुलबर्गा केंद्राने ३४ एकर जमीन खरेदी केली आहे ज्यापैकी १२ एकर मिशनसाठी राखीव असून बाकीच्या जमिनीवर अभ्यासींसाठी निवासी वसाहत उभारली जाणार आहे. गुरुदेवांनी नवीन आश्रमाचे नाव 'बाबूजी मेमोरिअल आश्रम, गुलबर्गा' व निवासी वसाहतीचे नाव 'योग जीवन एन्क्लेव्ह' असे ठेवले आहे. विकासाच्या या पुढच्या टप्प्यामुळे गुलबर्गा केंद्राची वेगाने प्रगती होईल अशी आशा आहे.









**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.